# प्रकरण दुसरे

## प्रवासवर्णनपर वाङ्मयातील अनंत काणेकरांचे स्थान

## प्रकरण दुसरे

## प्रवासवर्णनपर वाङ्‌मयातील अनंत काणेकरांचे स्थान --

### अनंत काणेकर : वाङ्‌मयीन व्यक्तिमत्व जडणघडण :

श्री अनंत काणेकरांचे मूळ गांव कोकणात मालवण असले, तरी त्यांचा जन्म मुंबईला झाला ( २-१२-१९०५ ) बालपणापासून त्यांची उभी ह्यातहि मुंबईत गेली. बालपणी त्यांच्या वडिलांचे ( आत्माराम अनंत काणेकर ) निधन झाले, ( अन छोट्या भाऊची ( काणेकरांचे बालपणापासूनचे घरगुती नांव ) सर्व जबाबदारी त्यांच्या मातु:श्री जनाबाई नि मामा श्री सीताराम पुंडलिक परमानंद यांच्यावर पडली. या बहिणभावांची छोट्या भाऊच्या शिक्षणाची व्यवस्था गिरगांवांतल्या " चिकित्सक समूह " शाळेत केली. त्यामुळे काणेकर वयाच्या सतराव्या वर्षी मुंबई विश्वविद्यालयाची मॅट्रिकची परीक्षा उत्तमरीत्या उत्तीर्ण झाले ( १९२२ ).

इंग्रजी शाळेत असताना ते आपले वर्गमित्र श्री. भा.ज. महाजन नि श्री. कृ.सबनीस यांच्या सहकार्याने एक हस्तलिखित मासिक चालवीत . त्यात त्यांच्या बालपणांतील कांही कविता नि लेख प्रसिध्द झाले.

इग्रंजी शाळेत असतानांच जरी त्यांचे मन वाङ्‌मयाकडे नकळत ओढ घेऊ लागले होते , तरी त्यांच्या साहित्यिक संसाराला खरोखुरी सुरवात झाली. ती सेंट झेवियर्स कॉलिजमधील त्यांच्या जीवनातच .

कॉलिजमध्ये जाण्यापूर्वी शालेय जीवनात काणेकरांनी आपल्या कविता, लेखनाला सुरवात केली असली तरी " चांदराती " मध्ये एकत्र केलेल्या कविता

त्यांनी कॉलेज जीवनांत लिहिल्या . कॉलेजात त्यांनी इंग्रजी काव्यावाचनाची गोडी लागली होती. कीटस, बायरन नि विशेषात: शेली हे त्यांचे आवडते इंग्रजी कवि. काणेकरांच्या कवितेचे मराठीतल्या जुन्या कविपरंपरेशी मुळीच नाते नाही. याचे कारण वरील कवीच्या काव्य वाचनाचाच परिणाम असावा. आपल्या मनोभावना ते कवितेच्या माध्यमांतून सरळसरळ व्यक्त करू लागले. त्यावेळी त्या कविता कुणाला आवडण्या-नावडण्याचा प्रश्नच नव्हता कारण एक दोन निकटवर्ती मित्र सोडले तर, कुणालाच त्यांच्या कविता लेखानाचे गुपित माहित नव्हते. आपण लिहीत असलेल्या कविताना पुढे मागे विशिष्ट दर्जा प्राप्त होईल याची जाणीवही त्याकाळी त्यांना नव्हती.

कॉलेजमध्ये त्यांना मराठी वाङ्‌मयाबरोबरच इंग्रजी साहित्याची अभिरूची लागली. या काळात हरिभाऊ आपटे, वा.म.जोशी, गडकरी यांच्या बरोबरच इब्सेन-शॉ-गॅल्सवर्दी यांसारख्या नाटककारांशी नि डिकन्स ,थॅकरे, इलियट,हार्डी गॉर्की ,टॉलस्टॉय प्रभृति कादंबरीकारांशी त्याची जानपहचान झाली. त्यातून ते भावकवितेच्या जोडीला कथा लिहू लागले. प्रेमाचा मोसम, "कालप्रवाहाशी झुंज " ,"काळेकुट्ट ढग " इ. " मोरपिसे " नि जागत्या छाया " या पुस्तकातील कथा याच काळात लिहिल्या गेल्या. मात्र कवितांप्रमाणेच कथाही प्रसिध्द करण्याची त्यांनी घाई केली नाही. त्यांच्या पहिल्या कवितेप्रमाणे त्यांची पहिली कथाहि प्रसिध्द करण्याचे श्रेय " रत्नाकर " मासिकाला आहे. त्या मासिकात " काळेकुट्ट ढग " ही १९२५ साली लिहिलेली पहिली कथा प्रसिध्द झाली (१९३१) आणि कथाकार काणेकरांचा जन्म झाला.

संस्कृत ऑनर्स घेऊन बी.ए. ची परीक्षा १९२७ साली दुस-या वर्गात उत्तीर्ण होताच त्यांनी कायद्याचा अभ्यास सुरू केला. १९३० साली वकिलीची सनदही घेतली पण काणेकर हे हाडाचे साहित्यिक. त्यांचे मन वकिलीत कसे रमणार' त्यामुळेच कोर्टात कायद्याचा कीस काढीत बसण्यापेक्षा वाचनालयांत जाऊन कथा कादंब-या वाचण्यातच ते जास्त वेळ घालवू लागले.

"चांदरात व इतर कविता " हे त्यांचे पहिलेवहिले पुस्तक १९३३ साली प्रसिध्द झाले. या एकाच पुस्तकाने त्यांना विलक्षण लोकप्रियता मिळवून दिली. त्यांचे नांव महाराष्ट्राच्या कोनाकोपऱ्यात लोकप्रिय झाले. नव्या दमाचा नि नव्या मतप्रणालीचा एक पुरोगामी प्रथितयश कवि म्हणून त्यांचा बोलबाला झाला.

१९३३–३४ साल हे काणेकरांच्या आयुष्यांतील महत्वाचे साल. याचवर्षी त्यांचे पहिले वहिले पुस्तक "चांदरात" प्रसिध्द झाले. " नाट्यमन्वंतरा" ची स्थापना झाली, ती याचवर्षी . नाट्यमन्वंतराची स्थापना जरी ११–४–१९३३ ला झाली, तरी काणेकराना रंगभूमीचे आकर्षण पूर्वीपासून होतेच। मराठी रंगभूमीवर नाट्यमन्वंतर करायला निघालेल्या त्या हौशी चालकात नवी नाटके आणण्या-बाबत लवकरच मतभेद होऊ लागले. त्यामुळे काणेकरांनी चालकत्वाचा राजीनामा दिला. नाट्यमन्वंतराचे मूल सभासद म्हणून अर्थात कंपनीच्या कामाशी त्यांचे सहकार्य चालू होतेच. वर्तकांच्या नेतृत्वाखाली " नाट्यमन्वंतर " ही संस्था कांही काळ चालू होती. परंतु १९३५ च्या एप्रिल महिन्याच्या अखेरीस नाट्यमन्वंतराचा अस्त झाला. इब्सेनच्या " Dolls House " या नाटकाचा काणेकरांनी "घरकुल " या नावाने कॉलेजमध्ये असतांना केलेला मराठी अनुवाद कांही अपरिहार्य कारणास्तव " नाट्यमन्वंतरांच्या रंगभूमीवर येऊ शकला नाही. काणेकरांचे प्रत्यक्ष नाटक जरी " नाट्यमन्वंतरा" ने रंगभूमीवर आणले नाही तरी त्यांची चारपाच भावगीते ( " तु " माझा अन् तुझा मीच", " आला खुशित समिंदर" "एकलेपणाची आग " इ. ) वर्तकानी मोठ्या हौसेने आपल्या नाटकात घातली होती. ही भावगीते ज्योत्स्ना भोळे यांच्या सुरेल गळ्यातून ऐकतांच ती रसिकांत कमालीची लोकप्रिय झाली. काणेकरांची भावकवि म्हणून कीर्ति अखिल महाराष्ट्रा- – त पसरली.

"पिकली पाने " पुस्तक प्रसिध्द होताच ( १९३४ ) कवीआणि लघु - निबंधाकार या दुहेरी नात्याने ते वाचकांसमोर आले. पण काय लिहावे यापेक्षा काय लिहू नये हे ज्याला कळते तोच खरा लेखक नि काय बोलावे यापेक्षा काय

बोलू नये हे ज्याला कळते तोच खरा वक्ता " हे त्यानीच एका लघुनिबंधात सांगितलेले विचार खरे करून दाखविले.

"नाट्यमन्वंतरा" चा अस्त झाल्यावर साप्ताहिक काढण्याची कल्पना काणेकरांच्या मनात घोळू लागली. पण वृत्तपत्रासृष्टीत ते नवखे होते. त्यामुळे त्यांच्यासारख्या नवख्या तरूणाला कुणातरी अनुभवी माणसाचे सहकार्य हवे होते. वृत्तपत्राव्यवसायाला कंटाळून रांगणेकर वृत्तपत्रासृष्टीतून कायमचे निवृत्त होण्याच्या तयारीत होते. अशावेळी साप्ताहिकाची कल्पना काणेकरांनी त्यांच्यापुढे मांडली रांगणेकराच्या निराश मनाला काणेकराचे आशावादी सहकार्य मिळताच त्या दोघानी " चित्रा" साप्ताहिक सुरू केले ( १५-९-१९३५ ).

काणेकर " चित्रा" मध्ये जवळजवळ चार वर्षे होते .( १९३५-३९ ) या अवधीत राजकीय लिखाणाबरोबर त्यानी " शिंपले आणि मोती " आणि " तुटलेले तारे " या पुस्तकांतील आपले लघुनिबंध लिहिले, तसेच पहिला कथासंग्रहहि "जाणत्या छाया " या नावाने प्रसिध्द झाला ( १९३५ ) या वर्षीच बडोद्याच्या महाराष्ट्र शारदा मंडळा तर्फे भारलेल्या स्नेहसम्मेलनाचे अध्यक्ष झाले." वाङ्मय आणि आधुनिकता " या विषयावर त्यानी केलेले भाषण साहित्य-विशारदा-मध्ये विशेष गाजले व पुरोगामी दृष्टीचा एक विचारवंत साहित्यिक म्हणून वयाच्या तिशीतच त्यांचा लौकिक झाला.

काणेकरांना प्रवासाची हौस बालपणापासून आहे. प्रवासाची संधी ते सहसा वाया दवडीत नाहीत. काणेकरांसारख्या जहाल समाजवाद्याच्या मनात रशियाबद्दल जबरदस्त कुतुहल होते. परंतु ब्रिटीश राजवटीत रशियाचा पासपोर्ट मिळविणे अशक्य होते. इंग्लडमध्ये सहाव्या जॉर्ज बादशहाचा राज्यरोहणसमारंभ होणार होता. तेव्हा पत्रकार या नात्याने आपण लंडनला जात आहोत असे सांगून त्यानी इंग्लंडचा पासपोर्ट मिळविला श्री शंकरराव किर्लोस्करानी त्यांची

प्रवासवृत्ताची लेखमाला " किर्लोस्कर" मध्ये प्रसिध्द करण्याचे अभिवचन दिले आणि त्यांनी " कॉंटिव्हर्डे " या बोटीने हिंदुस्थान सोडले ( २२-४-३७ ) लंडनहून रशियाला जाण्यासाठी " इन्टूरिस्ट " संस्थेमार्फत प्रयत्न करावा लागतो. काणेकरांनी मित्रांच्या सहाय्याने याचवेळी प्रो. रॅफे यांच्या नेतृत्वाखाली रशियाला जाणा-या नाट्यपथकात प्रवेश मिळविला. अनेक दिवसाचे उराशी बाळगलेले सोनेरी स्वप्न साकार झाले. या प्रवासाचे चटकदार वर्णन किर्लोस्कर मासिकात येत होते. तेव्हा ते श्री. बा.द. सातोरकरांना फार आवडले. पुढे यानीच ते " धुक्यातून लाल ता-याकडे "या नावाने प्रसिध्द केले ( १९४० ) .

कांही कालानंतर " चित्रा" चे एक प्रमुख शेअर होल्डर श्री.लोटवाला यांच्याशी रांगणेकर-काणेकरांचे मतभेद झाले. रांगणेकर, काणेकरानी "चित्रा" सोडून "आशा" हे नवे साप्ताहिक काढले ( १९३९ ) " आशा " साप्ताहिकांतून काणेकरांनी श्री. माधव मनोहर यांच्या " ज्वाला " या कादंबरीचे परीक्षण केले. या परीक्षणांतून साहित्याचे ध्येय नि कार्य याबाबत काणेकर माधव मनोहर व प्रभाकर पाध्ये या तिघांत चर्चा झाली. या चर्चेतील काणेकरांचे लेख पुढे " राखेतील निखारे " या त्यांच्या पुस्तकात संग्रहित करण्यात आले आहेत.(१९४२)

१९४१ मध्ये मुंबई ला मराठी पुरोगामी लेखक परिषद श्री.पु.ल.देशपांडे यांच्या अध्यक्षतेखाली भरली. तिचे स्वागताध्यक्ष काणेकर होते. त्याच वर्षी बडोद्याचे मराठी साहित्य सम्मेलनही भरले. त्याचेही अध्यक्षस्थान काणेकरांना देण्यात आले.

१९४१ ला " धूर आणि इतर एकांकिका" हा एकांकिकासंग्रह प्रसिध्द झाला. चित्राकार दलाल याच्या " चित्रा" नि आशा " मधून वेळोवेळी प्रसिध्द झालेल्या राजकीय टीका - चित्रांचा संग्रह काणेकरांच्या टीकेसह प्रसिध्द झाला ( १९४२ ) पुढे " सावरकर काव्य समालोचन "या प्रा. मायदेवानी संपादित केलेल्या पुस्तकांत त्यांचा " तारकास पाहून " हा रसग्रहणात्मक लेख प्रसिध्द झाला. (१९४३ ) याच सुमारास त्यानी सुप्रसिध्द इंग्रजी लेखक बर्ट्रांड रसेल यांच्या

" Marriage & Morals "या पुस्तकाचा रसेलनीति या नावाने केलेला अनुवाद प्रसिध्द झाला. शिवाय त्यांचा चौथा कथासंग्रही " काळी मेहुणी आणि इतर कथा " या नावाने प्रसिध्द झाला ( १९४२ )

"नवयुग " मध्ये राजकारणावर लेख लिहिणा-या एका संपादकाची जरूरी होती आचार्य अत्रे हे काणेकरांचे निकटवर्ती मित्र त्याना " नवयुग " साठी काणेकरांचे सहकार्य हवे होतेच. त्यांनी त्याना " नवयुग " मध्ये बोलाविले . कांही काल काणेकरांनी नवयुग ची राजकीय बाजू सांभाळली. या कालातच ते योगा-योगाने खालसा कॉलेजात मराठीचे प्राध्यापक झाले ( १९४१ ) त्यानंतर मात्र त्यांचा वृत्तपत्राशी असलेला संबंध जवळजवळ सुटलाच.

खालसा कॉलिजमध्ये काणेकर अदमासे पाच वर्षे होते ( १९४१-४६ ) ते खालसा कॉलिजमध्ये असतानाच "सिध्दार्थ कॉलिजची स्थापना झाली. खालसा कॉलिजमधील बरेचसे प्राध्यापक सिध्दार्थला येऊन मिळाले. त्याबरोबर काणेकरही आले, १९५० साली औरंगाबादला " मिलिंद कॉलिज " निघताच सिध्दार्थ चे मराठी विभागप्रमुख प्रा. चिटणीस यांची नेमणूक " मिलिंद कॉलिजचे " प्राचार्य म्हणून झाली आणि काणेकर सिध्दार्थ कॉलिजचे प्रमुख ( मराठी विभाग ) झाले. काणेकरांची प्राध्यापकीय कारकीर्दही यशस्वी झाली आहे.

खलिल जिब्रानचेबरेच साहित्य मराठीत अनुवादित करण्याची टूम याच सुमारास फारच वाढली होती. जिब्रानच्या श्रेष्ठ प्रतिभेची चर्चा वृत्तपत्रातून वारंवार होऊ लागली. यातूनच काणेकरांच्या मिस्किल डोक्यात एक विलक्षण कल्पना चमकून गेली. जिब्रानच्या नांवावर आपल्या स्वत:च्या ब-याच रूपककथा त्यांनी प्रसिध्द केल्या. त्यांचा संग्रही पुण्याच्या देशमुख कंपनीने " रूपेरी वाळू " या नावाने प्रसिध्द केला ( १९४७ )

इतर मराठी लेखकांच्या मानाने काणेकरांनी देशाटन अधिक केले .

युरोप प्रमाणेच जवळ जवळ संपूर्ण भारत त्यानी चित्रकार दलाल यांच्यासह पाहिला आहे. उत्तर भारताचा प्रवास त्यानी १९४९ मध्ये केला ; त्याचे मनोवेधक वर्णन " आमची माती आमचे आकाश " या नावाने प्रसिध्द आहे ( १९५२ ) दक्षिण - भारताचाही प्रवास १९५० मध्ये पुरा झाला. त्याचे वर्णन " निळे डोंगर तांबडी माती " ( १९५६ ) या पुस्तकांत आलेले आहे. मलाया, सिलोन, सिंगापूर, हाँगकाँग याही ठिकाणचा प्रवास केला आहे, त्याचे वर्णन " सोनेरी उन्हात पाचूची बेटे " या पुस्तकात आले आहे.

कवी, लघु-निबंधकार , कथालेखक , प्रवासवृत्त लेखक इ. अनेक नात्यांनी मराठीतील एक चतुरस्त्र लेखक म्हणून त्यानी मिळविलेले स्थान अनन्य साधारण आहे. लेखणीप्रमाणेच त्यानी आपल्या वाणीतही बुध्दिमत्तेची चमक दाखविली आहे. नव्या विज्ञानाचा नि समाजवादाचा पायरव त्यांच्या " चांदराती " त प्रथम ऐकू आला. " घरकुल"," फांस " या उत्कृष्ट रूपांतरांनी आणि " घर " "चांदवण्यांत मृत्यु " या सारख्या स्वतंत्र एकांकिकांनी त्यानी नाट्यक्षेत्रातली आपली आधुनिक दृष्टी प्रकट केली आहे." धुक्यातून लाल ता-याकडे " या त्यांच्या पहिल्या प्रवासवृत्ताने मराठी प्रवासवर्णनाला ललित वाङ्मयाच्या दालनात आणून सोडले. समंजस दृष्टीचे आणि खेळकर व्यक्तित्वाचे त्याचे वैशिष्टयपूर्ण लघुनिबंध ही तर मराठी साहित्याला त्यांनी दिलेली अमोल देणगीच म्हणावी लागेल. कादंबरी वगळल्यास ललित वाङ्मयाची अशी एकही शाखा नाही की जीत काणेकरांच्या लेखणीने संचार केला नाही.

काणेकरांच्या ललित गद्यात्मक साहित्यातील प्रवासवर्णन पर वाङ्मय हे मराठी साहित्याच्या विकासाच्यादृष्टीने फार वैशिष्टयपूर्ण मानावे लागेल.

प्रवासवर्णन वाङ्मय प्रकाराच्या वाटचालीवरील पहिला दीपस्तंभ --

काणेकरांच्या प्रवासवर्णनात्मक लेखनाचा विचार केला तर "नेहमीचे काणेकर जितक अगदी स्वच्छपणे त्यांच्या प्रवासलेखनांतून प्रकट होतात तितके त्यांच्या दुस-या कोणत्याच लेखनातून प्रकट होत नाहीत ."[१]

"धुक्यातून लाल ता-याकडे ( १९४० ) " आमची माती आमचे आकाश" (१९५०) ,"निळे डोंगर तांबडी माती "( १९५७ ) , "सोनेरी उन्हात पाचूची बेटे" (१९५९ ) ," रक्ताची फुले" ( १९५९ ) ,"खडक कोरतात आकाश" ( १९६४ ).

काणेकरांची वर नमूद केलेली सर्व प्रवासवर्णने केवळ प्रवासवर्णनेच आहेत. ते वृत्तांत नाहीत किंवा निबंध नाहीत . या " प्रत्येक पुस्तकाच्या नावात काव्यात्मकता आहे. आणि निसर्गप्रेमी कवी काणेकरानी नेमके प्रदेश वैशिष्टय व तेथील निसर्ग वैशिष्टय हेरून ती दिली आहेत."[2]

प्रवास वर्णन या वाङ्मयप्रकाराच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाचा कालखंड आहे ( १९४० ते १९६५ ) असेच म्हणावे लागते कारण या कालखंडात विशेषत: १९५० ते १९६५ मधील वाङ्मयीन दृष्टीने लिहिलेली प्रवासवर्णने आपल्या कलात्मक उंचीचा सतत प्रत्यय देताना दिसतात. या कालखंडात अनेक श्रेष्ठ प्रवासवर्णनकार भेटतात उदा. प्रा.अनंत काणेकर , काका कालेलकर,प्रा.रा.भि.जोशी, प्रा. गंगाधर गाडगीळ ,श्री.पु.ल.देशपांडे, श्री.प्रभाकर पाध्ये पण या कालखंडातील श्रेष्ठ प्रवासवर्णनकार म्हणून मान जातो तो अनंत काणेकर यांच्याकडे. इ.स. १९४० ते १९६९ पर्यन्त आपल्या काव्यात्म व प्रतिभाशाली लेखनाने प्रा.अनंत काणेकरांनी प्रवासवर्णनकार म्हणून ,आपले एक वेगळे स्थान निर्माण केले आहे. हे लेखन मुळापासून अव्याहत चालू असल्याने त्यांच्या प्रवासलेखनविषयक कार्याचा गौरव " प्रवासवर्णन या वाङ्मयप्रकाराच्या वाटचालीवरील पहिला दीपस्तंभ म्हणून करावासा वाटतो "[3] कारण प्रवासवर्णन या लेखन प्रकाराला ललित वाङ्मयाच्या क्षेत्रात आणून सोडले ते प्रामुख्याने काणेकरानीच.

मराठीत प्रवासवर्णन हा वाङ्मयप्रकार बराच काळ भूगोलाचे पाठ्यपुस्तक आणि प्रवासी खाण्याची मार्गदर्शिका समप्रमाणात खालून तयार करीत असते. वरसईकर गोडशांचा " बंडातला प्रवास " किंवा प्रा.अनंत काणेकरांचे

"धुक्यातून लाल ता-याकडे " यासारखी प्रवासवर्णने अपवादच होती. याविषयी डॉ. अ.ना. देशपांडे म्हणतात " मराठीतील प्रवासवृत्तलेखन आधुनिक अभिरूचीच्या दिशेने वाटचाल करू लागल्याची स्पष्ट चिन्हे प्रा. अनंत काणेकरांच्या " धुक्यातून लाल ता-याकडे " व " आमची माती आमचे आकाश " या पुस्तकात उमटलेली आहेत ."[४] तसेच " धुक्यातून लाल ता-याकडे " हे मराठीतील केवळ एक ठळक प्रवासवर्णन नाही, तो मैलाचा दगड आहे. एक महत्वाचा टप्पा आहे " [५] असे श्री. काशिनाथ पोतदार यांनी म्हटले आहे. कारण इथून पुढे माहिती , ज्ञान आणि मनोरंजन हे हेतू प्रवासवर्णने लिहिण्यामागे आहेतच परंतु ते मागे टाकून लिखाळ वाङ्मयीन दृष्टीने लिहिलेली अनेक प्रवासवर्णने " धुक्यातून लाल ता-याकडे " या ग्रंथापासून सुरू होतात.

१९४० पर्यन्त प्रवासवर्णनपर लेखनाला कलात्मकतेचा स्पर्श झालेला नव्हता. यापूर्वीची प्रवास वर्णने म्हणजे केवळ वृत्तात लेखन असे " ती केवळ स्थळवाचक असत"[६] पूर्वी प्रवासातील भूगोलाला आणि पाहिलेल्या गोष्टींची माहिती देण्याला महत्त्व असे. पाहणारी व्यक्ती गौण असे. आता प्रवासातील " मी " हा घटक केंद्रस्थानी आला. त्याच्या व्यक्तीत्वाच्या रंगात प्रवास वर्णन न्हाऊन निघू लागले. एकच देश,प्रदेश, गाव, शहर अनेकांनी पाहिले तरी प्रत्येकाची दृष्टी स्वतंत्र असते ही दृष्टी त्या त्या व्यक्तीमत्वातील विविध पैलू मुळेच.

"ललित गद्याच्या विकासाचा एक नवा रस्ता म्हणजे प्रवास वर्णने "[७] प्रवास हा आनंदासाठी नवेनवे अनुभव मिळविण्यासाठी असतो अशा दृष्टीमुळे प्रवास करावेत अशी उर्मी वाढीला लागली. विशेष म्हणजे प्रवासाचा हेतू बदलल्यावर प्रवासवर्णनाचे रूपही बदलण्याची प्रक्रीया हळूहळू त्या काळात सुरू झाली. प्रवासामुळे वेगवेगळ्या ठिकाणी फिरल्यामुळे , वेगवेगळ्या परिस्थितीतली माणसं बघून स्वत:कडे आणि इतराकडे बघण्याची दृष्टी अधिक समजूतदार बनते हे एक कथी

कधी अनपेक्षितपणे स्वत:ची देखील ओळख अधिक जवळून पटते. " पु. वि. बेहरे म्हणतात " प्रवासाच्या निमीत्तानं जो वेगवेगळी माणसे भेटतात त्यांच्यात मला स्वास्थ्य असतं. प्रत्यक्ष स्थळ दर्शनापेक्षा देखील प्रवासातल जे वातावरण असतं " जो मोहोल" असतो तो माझ्या दृष्टीने महत्वाचा ," [८] प्रा. अनंत काणेकरांच्या "प्रवासवर्णनाने हे नवे भान, निर्माण केले " [९] काणेकरांनी ललित वाङ्‌मय प्रकार म्हणून प्रवास लेखनाला प्रतिष्ठा मिळवून दिली. काणेकरांच्या"धुक्यातून लाल ता-याकडे " या प्रवास वृत्तांताने प्रवास वर्णनाला लालित्याची पदवी प्रथम प्राप्त करून दिली.

या लघुप्रबंधिकेतून अनंत काणेकरांच्या " खडक कोरतात आकाश " आणि " निळे डोंगर आणि तांबडी माती" या दोन प्रवास वर्णनांचा अभ्यास करावयाचा आहे.

काणेरांना प्रवासाचे ,माणसाचे विलक्षण वेड आणि म्हणूनच त्याचे प्रवासवर्णनात्मक लेखन हे केवळ त्या त्या प्रसंगाचे व स्थळांचे रेखाटन अशा स्वरूपाचे राहात नाही. त्यांच्या सा-या लेखनामधील त्यांच्या व्यक्तीत्वाचे रंग बेमालूम मिसळून जातात " निळे डोंगर आणि तांबडी माती " या प्रवास वर्णनातून भारताच्या विविधतेचे दर्शन जितक्या उत्कंठतेने व कुतुहलाने घेतले तितक्याच सहजतेने त्यांनी या प्रवासाचे शब्दचित्र साकार केले आहे. दलालांची रेखाचित्रे आणि काणेकरांची शब्दचित्रे एकजीव झालेली दिसतात. त्याचप्रमाणे " खडक कोरतात आकाश " हे अमेरिकेच्या प्रवासवर्णनावर आधारलेले आणि प्रवास वर्णनाच्या गुणवत्तेनी परिपूर्ण असलेले पुस्तक या दोनही पुस्तकांचा अभ्यास या प्रबंधिकेतून करावयाचा आहे.

## प्रकरण दुसरे

## संदर्भ टीपा

| | | |
|---|---|---|
| १ | वा.ल. कुलकर्णी | -" काणेकर आणि त्यांचे प्रवासलेखन, काणेकर व्यक्ती आणि वाङ्मय, प्रकाशक सुरेश राऊत, मुंबई, संपादक अविनाश केळकर, प्र.आ. १९५६, पृ.क्र.७०. |
| २ | डॉ. वसंत सावंत | -"प्रवास वर्णन: एक वाङ्मय प्रकार, महाराष्ट्र राज्य साहित्यआणि संस्कृती मंडळ, मुंबई, प्र.आ.जाने., १९८०. पृ.२६६. |
| ३ | स.गं. मालशे | - तत्रैव |
| ४ | डॉ.अ.ना, देशपांडे | -"आधुनिक मराठी वाङ्मयाचा इतिहास, ( भाग दुसरा) व्हीनस प्रकाशन, पुणे, प्र.आ.जाने, १९५८, पृ.क्र.७२२,७२३. |
| ५ | श्री काशिनाथ पोतदार | -" मनोहर, मासिक, अंक, डिसेंबर १९६०, पृ.२३. |
| ६ | माधव मनोहर | -"१९६८ मधील विनोद, प्रवास वर्णन इ. ललित साहित्य " मे १९६९, पृ.क्र.२६. |

७ डॉ. मेघा सिधाये –" मराठी वाङ्‌मयाचा अभिनव इतिहास
(काही लेखक, काही साहित्यकृती)
इ.स. १९२०–१९६०,
संपा. डॉ. गं.ना. जोगळेकर,
स्नेहवर्धन पब्लिशिंग हाऊस, पुणे–
पु.आ.१, एप्रिल १९९३, पृ.क्र. ११६.

८ संपादकाचे मनोगत –" माहेर , फेब्रु, १९९७,
संपा. पु.वि.बेहरे, सौ.सुमन बेहरे,
मेनका प्रकाशन, २११७,
सदाशिवपेठ, विजयानगर कॉलनी,
पुणे–४११०३०.

९ डॉ. मेघा सिधाये –" उनि.